# वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूचा २६ टक्के काम पूर्ण झाले

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूच्या कामास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून २०१९ पासून सुरुवात करण्यात आली आहे. मात्र या सहा वर्षाच्या या प्रकल्पाचे केवळ २६ टक्केच काम पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प लांबणीवर पडला असून आता मे २०२८ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करत सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल करण्याचे आव्हान एमएसआरडीसीसमोर असणार आहे.

वरळी ते वांद्रे सागरी सेतूचा विस्तार वांद्रे ते वर्सोवा असा केला जात आहे. १७.१७ किमीचा आणि आठ मार्गिकांचा असा वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू आहे. या प्रकल्पाच्या कामास २०१९ मध्ये एमएसआरडीसीकडून सुरूवात करण्यात आली. मात्र कंत्राटदाराने २०१९ ते २०२२ दरम्यान प्रकल्पाचे काम कासवगतीने केले. त्यामुळेच या कालावधीत केवळ अडीच टक्के काम झाले होते. करोना संकटाचे कारण यावेळी देण्यात आले होते. मात्र कंत्राटदाराच्या भागीदारीमध्ये आलेल्या अडचणींमुळे कंत्राटदाराकडून २०१९ ते २०२२ दरम्यान कित्येक महिने करण्यात आले नव्हते. तीन वर्षातील कामाच्या पूर्णत्वाची टक्केवारी पाहता एमएसआरडीसीने कंत्राटदाराविरोधात कारवाईचा बडगा उगारला. कंत्राटादारावर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईनंतर अखेर कंत्राटदाराने भागीदार कंपनी बदलून २०२२ मध्ये कामास सुरुवात केली. त्यानंतर कामाने वेग घेतला असे सांगितले जात असले तरी एकूण सहा वर्षाच्या काळात या प्रकल्पाचे केवळ २६ टक्केच काम पूर्ण झाले आहे. सागरी सेतूचे आतापर्यंत २६ टक्के काम पूर्ण झाल्याच्या वृत्ताला एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकार्यांनी दुजोरा दिला आहे. मात्र तांत्रिक अडचणी आणि आव्हानात्मक कामामुळे कामास वेळ लागत असल्याचे अधिकार्यांनी सांगितले. जुहू कनेक्टरला मच्छिमारांनी विरोध केल्याने अनेक महिने कनेक्टरचे काम सुरू करता आले नाही. कनेक्टरच्या मार्गात बदल करावा लागला.

# मुंबईत भाजप–शिवसेनेत पहिली 'मैत्रीपूर्ण' लढत

## कुलाब्यातील वॉर्ड २२५ मध्ये नार्वेकर विरुद्ध सानप असा थेट सामना

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता पहिली मैत्रीपूर्ण पण तितकीच निर्णायक लढत रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कुलाब्यातील वॉर्ड क्रमांक २२५ मध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) आमनेसामने उभे ठाकणार असून, या लढतीकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे.

या वॉर्डमधून सुजाता सानप शिवसेनेकडून माजी नगरसेविका यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर भाजपा हर्षिता नार्वेकर या निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. त्यामुळे कुलाब्यात आता नार्वेकर विरुद्ध सानप असा थेट आणि चुरशीचा सामना पाहायला मिळणार आहे.

जरी राज्यात भाजप आणि शिंदे गटाची शिवसेना सत्तेत एकत्र असली, तरी मुंबई महापालिकेच्या काही प्रभागांमध्ये दोन्ही पक्षांनी स्वतंत्र उमेदवार दिले आहेत. त्यातील कुलाबा वॉर्ड २२५ ही पहिली जाहीर झालेली मैत्रीपूर्ण लढत मानली जात आहे. या लढतीत युतीचा धर्म सांभाळायचा की आपला बालेकिल्ला मजबूत ठेवायचा, हे आव्हान दोन्ही पक्षांसमोर आहे.

हर्षिता नार्वेकर आणि सुजाता सानप—दोघीही माजी नगरसेविका असल्याने ही लढत अनुभवाची





ठरणार आहे. कुलाबा परिसरातील स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा, विकासकामे आणि जनसंपर्क या मुद्द्यांवरच प्रचाराचा जोर राहण्याची शक्यता आहे.

भाजप नार्वेकर यांच्या माध्यमातून आपली पकड अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न करणार, तर शिवसेना सानप यांच्या नेतृत्वाखाली आपले संघटन बळ दाखवण्याच्या तयारीत आहे.

कुलाबा हा दक्षिण मुंबईतील राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा भाग मानला जातो. त्यामुळे या वॉर्डमधील निकालाचा राजकीय संदेश संपूर्ण मुंबईत जाण्याची शक्यता आहे.

विशेषतः भाजप–शिवसेना युतीतील अंतर्गत ताकदीचे मोजमाप या निकालातून होणार असल्याचे बोलले जात आहे.

औपचारिकदृष्ट्या ही लढत मैत्रीपूर्ण असली, तरी प्रचारात दोन्ही पक्ष ताकद लावणार यात शंका नाही. कार्यकर्त्यांची मोट बांधणी, बूथ मॅनेजमेंट आणि स्थानिक मतदारांपर्यंत पोहोचण्याची क्षमता—या सार्‍यांची कसोटी या लढतीत लागणार आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीतील या पहिल्याच मैत्रीपूर्ण लढतीकडे आता सर्वांचे लक्ष लागले असून, नार्वेकर विरुद्ध सानप या संघर्षातून कुलाब्याची राजकीय दिशा कोणती ठरणार, हे निकालच सांगतील.

# अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन वेळेत व पारदर्शक पद्धतीने होणार

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सातत्यासाठी नवी सर्वसमावेशक कार्यपद्धती - सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा व कार्यशाळांमधील अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी शासनाने सर्वसमावेशक, एकसंध आणि कालबद्ध कार्यपद्धती निश्चित केली असून, ही प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेत पूर्ण केली जाईल, अशी माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव यांनी दिली.

दिव्यांगांच्या विशेष शाळा व कार्यशाळांमध्ये नोंदणी प्रमाणपत्र रद्द होणे, मान्यता नूतनीकरण न करणे, तसेच दरवर्षी होणाऱ्या पटनिर्धारण प्रक्रियेनंतर विद्यार्थीसंख्या कमी झाल्यामुळे अनेक ठिकाणी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरत होते. यापूर्वी या समायोजनासंदर्भात शासन निर्णय, परिपत्रके व शाळा संहितेतील तरतुदी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने प्रक्रिया लांबत होती आणि न्यायालयीन वाद वाढत होते. ही बाब लक्षात घेऊन आता आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्या नियंत्रणाखालील अतिरिक्त संवर्ग कक्षामार्फत समायोजन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सचिव मुंढे यांनी स्पष्ट केले की, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही खंड पडू नये, हा या कार्यपद्धतीचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे समायोजनासाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्यात आली असून, या नव्या पद्धतीमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक होऊन शैक्षणिक सातत्य राखले जाईल.

शासन मान्यताप्राप्त खासगी अनुदानित विशेष शाळा किंवा कार्यशाळेची मान्यता रद्द झाल्यानंतर अपिलास स्थगिती नसेल, तर संबंधित उपक्रम आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्याकडून तात्काळ बंद करण्यात येतील. अशा वेळी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कायमस्वरूपी समायोजन होईपर्यंत त्यांना समान प्रकारच्या उपक्रमांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित केले जाईल. यासाठी जवळच्या शाळांची क्षमता तात्पुरती वाढवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

शाळा संहितेनुसार विद्यार्थ्यांची पटनिर्धारण प्रक्रिया दरवर्षी १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. पटनिर्धारणानंतर अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांची यादी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात आणि त्यानंतर दर महिन्याला विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रसिद्धीनंतर एका महिन्याच्या आत समायोजन पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही सचिव मुंढे यांनी सांगितले.

समायोजन शक्यतो संबंधित जिल्ह्यात, अन्यथा लगतच्या किंवा इतर जिल्ह्यांमध्ये करण्यात येईल. आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या कर्मचाऱ्यांना समान वेतनश्रेणीतील समकक्ष पदावर नियुक्ती देण्यात येणार असून, प्रथम दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. समायोजन आदेशानंतर विहित कालमर्यादेत रुजू न झाल्यास संबंधितांवर शिस्तभंग कारवाई करण्यात येणार आहे.

अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध असताना नवीन भरतीस मान्यता दिली जाणार नाही. तसेच समायोजनास नकार देणाऱ्या किंवा परस्पर भरती करणाऱ्या संस्थांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दिव्यांग कल्याण विभागाच्या नियंत्रणाखालील विशेष शाळा व कार्यशाळांमधील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे विहित मुदतीत समायोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर) तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांची राहणार असल्याचे सचिव मुंढे यांनी स्पष्ट केले.

या संदर्भातील सविस्तर शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाकडून निर्गमित करण्यात आला असून तो महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत मुंबई शहरातील खेळाडूंना नवी संधी

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मिशन लक्ष्यवेध या योजनेंतर्गत मुंबई शहर जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या केंद्राच्या माध्यमातून ऑलिम्पिक तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवू शकणाऱ्या खेळाडूंच्या घडणीस प्रोत्साहन दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ मुंबई शहरातील खेळाडूंनाही मिळणार असून, या उपक्रमास जिल्हा स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

या क्रीडा प्रतिभा विकास केंद्रामध्ये बॅडमिंटन, बॉक्सिंग, शूटिंग, लॉन टेनिस आणि टेबल टेनिस या पाच खेळांचा समावेश करण्यात आला आहे. निवड झालेल्या खेळाडूंना तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकांच्या देखरेखीखाली प्रशिक्षण दिले जाईल. तसेच आधुनिक क्रीडा साहित्य, स्पोर्ट्स किट, पूरक आहार, वैद्यकीय उपचार, विमा संरक्षण तसेच देशांतर्गत स्पर्धांमधील सहभागाचा खर्च शासनामार्फत करण्यात येणार आहे.

जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना प्राधान्याने संधी देण्यात येणार आहे. खेळाडूंची निवड टप्याटप्याने करण्यात येईल, मुंबई शहरातील गुणवंत खेळाडूंनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

या केंद्रासाठी इच्छुक व पात्र क्रीडा मार्गदर्शक तसेच प्रशिक्षण केंद्र चालकांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज २ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहर, भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, सायन (पश्चिम), धारावी, मुंबई येथे करावे. अर्जदार dsomumbaicity@gmail.com या ई-मेल पत्त्यावरही अर्ज करू शकतात.

या उपक्रमामुळे मुंबई शहरातील खेळाडूंना उच्च दर्जाच्या क्रीडा प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून, ऑलिम्पिक स्तरापर्यंत मजल मारण्यासाठी नवी दिशा मिळणार आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी मुंबई शहर (धारावी) मार्क धरमाई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# हेटवणे जलवर्धन योजनेतील बोगदा खोदण्याच्या कामी सिडकोने गाठला महत्वपूर्ण टप्पा



**नवी मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

हेटवणे पाणी पुरवठा योजनेतील अत्यंत प्रतिकूल अशा भूगर्भशास्त्र आणि अभियांत्रिक विषयक आव्हानांवर मात करून सिडकोने दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी पहिल्यांदाच बोगदा खोदण्याच्या कामासंदर्भात अद्वितीय कामगिरी करून इतिहास रचला. सिडकोच्या आजवरच्या प्रकल्पांपैकी बोगदा खोदण्याच्या कामासंर्भात पहिल्यांदाच अशाप्रकारे ऐतिहासिक कामगिरी करण्यात आली आहे. या कामगिरीचे यश साजरे करण्यातकरिता प्रकल्पस्थळी श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्रीमती. शीला करूणाकरन, मुख्य अभियंता (न.मु. आं.वि. व वि. प्र.), सिडको, श्री. प्रवीण सेवतकर अधीक्षक अभियंता (पाणी पुरवठा), सिडको यांसह सिडकोच्या पाणी पुरवठा विभागातील अधिकारी आणि ऑफकॉन्समधील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सातत्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबईतील पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्याकरिता सिडकोतर्फे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत प्रक्रियारहित पाण्याकरिता १३.२५ किलोमीटरचा तर शुद्ध पाण्याकरिता १५.४ किलोमीटरचा बोगदा उभारण्यात येणार आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर सिडकोला सध्याच्या १५० एमएलडी ऐवजी २७० एमएलडीचा वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होणार आहे.

सिडकोच्या जलबोगदा पॅकेज-1 अंतर्गत वहाळ गावातील शाफ्ट-४ येथे ही ऐतिहासिक कामगिरी पार पाडण्यात आली. अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चरतर्फे पॅकेज-१ ची अंमलबजावणी करण्यात येत असून यामध्ये शुद्ध पाण्यासाठी ८.७ किलोमीटर लांबीचा बोगदा खोदण्यात येणार असून त्यापैकी ५.५२ किलोमीटर बोगदा खोदण्याचे काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे.

सिडकोतील अभियंते आणि ऑफकॉन्सच्या टीमने अनेक भूगर्भशास्त्रीय, अभियांत्रिकी आणि निजोयनविषयक आव्हानांवर मात करून बोगदा खोदण्याची ही ऐतिहासिक कामगिरी पार पाडली आहे. जमिनीखाली अंदाजे १०० मीटरवर हा बोगदा खोदण्यात आला. बोगद्याचा मार्ग हा दक्षिणेतील सह्याद्रीच्या प्रदेशातील भरित कुहरी (अमिग्डॉइडल) बेसाल्टसारख्या जटिल भूरचनांमधून जाणारा होता. जागेच्या मयदिमुळे साधनांची उभारणी करणे व हालचाल करवणे कठीण बनले होते. तसेच अशाप्रकारच्या बोगदा खोदण्याच्या कामी मकिंगकारची हालचाल करवणे आव्हानात्मक होते. परंतु सिडकोतील अभियंते आणि ऑफकॉन्सची टीम यांच्या परस्पर समन्वय आणि प्रयत्नांद्वारे या आव्हानांवर यशस्वीरीत्या मात करण्यात आली.

यापूर्वी, या प्रकल्पांतर्गत ऑफकॉन्सतर्फे ३.२ मीटर व्यासाचे टनेल बोरिंग मशिन (टीबीएम) फ्लेमिंगोचा वापर करून एक महिन्याच्या कालावधीत, ७७७ मीटरचा बोगदा खोदून एक नवीन राष्ट्रीय विक्रम रचण्यात आला. या कामगिरीद्वारे या वर्षीच्या मे महिन्यामध्ये ७१४ मीटरचा बोगदा एका महिन्यामध्ये खोदून केलेला ऑफकॉनचाच विक्रम मोडित निघाला.

# राज्यातील नोकरवर्गास १५ जानेवारी रोजी भरपगारी सुट्टी

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

राज्यातील सर्व सरकारी,निमसरकारी आणि खासगी आस्थापना मधील सर्व कर्मचाऱ्यांना यंदाची संक्रात पावली आहे. १५ जानेवारी रोजी मुंबई, ठाणेसह २९ महापालिकाध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्यासाठी सरकार कडून सर्व नोकरदार वर्गास भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या परिच्छेद १३५(बी) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये काही संस्था/आस्थापना त्यांच्या कामगारांना मतदानाची भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत असे आढळून आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे १५ रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार असून या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामधील सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.उद्योग आणि कामगार विभागाने याबाबतचे आदेश दिले आहेत. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादीना लागू राहिल (उदा. खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी, हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.) आदींना ही सुट्टी लागू राहील.

अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थपनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादीना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द कारवाई करण्यात येईल असा इशाराही सरकारने दिला आहे.

# भिवंडीत उपजिल्हा रुग्णालयात रेबीज लसीचा तुटवडा

**भिवंडी, दि. ३० : प्रतिनिधी**

तालुक्यातील सोनाळे पाडा येथील भाजपचे अनुसूचित जाती जमाती मोर्चाचे अध्यक्ष दिनेश सुरेश भोईर यांच्या मुलाला श्वानाने दंश केल्याची घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.त्यानंतर त्यांनी मुलाला श्वान दंशाची रेबीज ची प्रतिबंधक लस देण्यासाठी प्रथम पडघा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली.मात्र त्या ठिकाणी रेबीजची लस उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. यानंतर त्यांना भिवंडी येथील स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला.परंतु आयजीएम रुग्णालयात गेल्यानंतरही तेथेही लस उपलब्ध नसल्याचे समोर आले आणि तिथूनही ठाण्यातील सिव्हिल रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला असता यावेळी लस उपलब्ध नसण्याबाबत दिनेश भोईर यांनी विचारणा केली असता संबंधित डॉक्टरांकडून उद्धट व अयोग्य भाषेचा वापर केल्याचा आरोप भोईर यांनी केला आहे.

# कोस्टल रोडवर तीन वाहनांमध्ये जोरदार धडक, दोन जखमी

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

मुंबईची जीवनवाहिनी ठरत असलेल्या कोस्टल रोडवर आज वाहनावरील नियंत्रण सुटल्याने एकापाठोपाठ एक तीन वाहनांमध्ये भीषण धडक झाली. वरळी येथील नमन इमारतीसमोर कोस्टल रोडच्या उत्तर दिशेकडील मार्गावर ही घटना घडली. या अपघातात एक आलिशान मर्सिडीज आणि दोन टॅक्सींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वरळी पोलीस आणि कोस्टल रोडचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला हटवून रस्ता मोकळा केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोस्टल रोडवरून जात असताना मर्सिडीज कारच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव असलेल्या या कारने समोर असलेल्या दोन टॅक्सींना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, तिन्ही वाहनांचा चक्काचूर झाला आहे. या अपघातात टॅक्सी चालक आणि मर्सिडीजमधील प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघातात टॅक्सी चालकाला किरकोळ दुखापत झाली आहे. मात्र, मर्सिडीज कारमधील एका प्रवाशाच्या डाव्या खांद्याला गंभीर दुखापत झाली असून, त्यांना तात्काळ उपचारासाठी ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान 'रस्ता सुरक्षा अभियान'

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर 1 ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबिर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना "सडक सुरक्षा – जीवन रक्षा" अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडित आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या अभियानामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अशा परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केली आहे.

# महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केली लोअर परळ व कांदिवली येथील निवडणूक प्रशिक्षण केंद्रांची पाहणी

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. भूषण गगराणी यांनी लोअर परळ तसेच कांदिवली येथील निवडणूक प्रशिक्षण केंद्रांना आज (दिनांक ३० डिसेंबर २०२५) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच, प्रशिक्षण सत्राला उपस्थित राहून संपूर्ण प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.



बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ करिता गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रात परिमंडळ क्षेत्रनिहाय सात विविध ठिकाणी म्हणजेच अण्णाभाऊ साठे सभागृह (भायखळा), ना. म. जोशी मार्ग महानगरपालिका शाळा, करी रोड (लोअर परळ), लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय सभागृह (शीव पूर्व), बालगंधर्व सभागृह, लिंक रोड (वांद्रे पश्चिम), मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह (विलेपार्ले), महाकवी कालिदास नाट्यगृह (मुलुंड पश्चिम) आणि प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे नाट्यगृह (बोरिवली पश्चिम) येथे प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी लोअर परळ येथील ना. म. जोशी मार्ग महानगरपालिका शाळा तसेच कांदिवली येथील प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे नाट्यगृह येथे सुरू असलेल्या प्रशिक्षण केंद्रांना आज (दिनांक ३० डिसेंबर २०२५) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच, प्रशिक्षण सत्राला उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) मधील बॅलेट युनिट (BU) व कंट्रोल युनिट (CU) यांची जोडणी, मॉक पोल घेण्याची कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी अनुसरावयाच्या सर्व प्रक्रिया याबाबत श्री. गगराणी यांनी सविस्तर माहिती घेतली.

या पाहणीदरम्यान विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) श्री. विजय बालमवार, उप आयुक्त (परिमंडळ ७) श्री. संजय कु-हाडे, उप आयुक्त (परिमंडळ २) श्री. प्रशांत सपकाळे, सहायक आयुक्त (जी दक्षिण विभाग) श्रीमती स्वप्नजा क्षीरसागर, सहायक आयुक्त (आर मध्य विभाग) श्री. प्रफुल तांबे यांच्यासह निवडणूक विभागातील अधिकारी उपस्थित होते.


ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8451942710| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **ARGFL/SME-LAP/MUM/1168** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger. net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषत: नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स एजिस इन्फ्रा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) शाह कॉम्प्लेक्स क्रमांक १, सी विंग, दुकान क्रमांक १५, पाम बीच रोड, सेक्टर १३, सानपाडा, नवी मुंबई: ४०० ७०५. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) श्री. आनंद प्रकाश शर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०५, शाह कॉम्प्लेक्स ४, प्लॉट क्रमांक १०, पाम बीच रोड, सेक्टर १४, सानपाडा, मुंबई: ४०० ७०५. (३) श्रीमती उर्मिला आनंद शर्मा (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०५, शाह कॉम्प्लेक्स ४, प्लॉट क्रमांक १०, पाम बीच रोड, सेक्टर १४, सानपाडा, मुंबई: ४०० ७०५. | |
| मालमत्तेचा पत्ता:– युनिट क्रमांक. ५०२, ए विंग, ५वा मजला, एव्हरेस्ट निवारा, इन्फोटेक पार्क १, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, नवी मुंबई: ४०० ७०५. | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. १,१९,८८,१०९/– (रुपये एक कोटी एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे नऊ फक्त) |
| लिलावाची तारीख | १९ जानेवारी २०२६ |
| राखीव किंमत | रु. १,१४,०६,०००/– (रुपये एक कोटी चौदा लाख सहा हजार फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/– (फक्त दहा हजार रुपये) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | १२ जानेवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | १६ जानेवारी २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १९ जानेवारी २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट www.rathi.com ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ३० डिसेंबर २०२५
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता